निरुपयोगी, दुरुस्ती न होण्याजोग्या अथवा गरजेपेक्षा अतिरिक्त असलेल्या शासकीय भांडार वस्तू, यंत्रसामुग्री, वाहने इत्यादींची लिलावाने विक्री करण्याची व्यवस्था.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
### शासन परिपत्रक क्रमांकः डीएफपी-१०१६/प्र.क्र.०७/१६/ विनियम

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २२ जून, २०१६

वाचा :

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांकः डीएफपी-१०६१/१२१९५/७, विनियम, दि.२८.६.१९६२.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: डीएफपी-१०९१/प्र.४/विनियम, दि.१८.६.१९९१.
३) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक: विअप्र-१०००/प्र.क्र.३१/२००१/विनियम, दि.१५.६.२००१.

परिपत्रक :

निरुपयोगी, उपयोगात नसलेल्या किंवा गरजेपेक्षा अधिक असलेल्या भांडारवस्तूंचे निर्लेखन करणे व त्यांची विक्री करणे याबाबत सूचना संदर्भीय क्र.२ च्या शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, दि.१८.६.१९९१ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये संदर्भीय क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. कालानुरुप सदर परिपत्रकातील काही तरतूदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१. प्रशासकीय विभागांनी निरुपयोगी व दुरुस्त न होण्याजोग्या वाहनांच्या विक्री संदर्भात संदर्भाधिन शासन परिपत्रक दिनांक १८.०६.१९९१ मधील कार्यपध्दत अवलंबावी.

२. हातची किंमत रु.५०,०००/- पेक्षा जास्त असेल तेव्हा संदर्भाधीन दि.१८.०६.१९९१ च्या शासन परिपत्रकामधील परि.५ (एक) नुसार वृत्तपत्रात निविदा मागविणारी किंवा लिलावाची जाहिरात दयावी. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर ही जाहिरात देण्यात यावी. तथापि, हातची किंमत रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यास लिलावाच्या नोटिशीची किंवा निविदा मागविणारी जाहिरात कार्यालय प्रमुखाने महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर देणे पुरेसे असेल.

३. हातच्या किंमतीपेक्षा निविदेची / लिलावाची किंमत कमी येत असेल तर विभाग प्रमुखाने एक महिन्यांचे आत पुन्हा जाहिरात देऊन निविदेची / लिलावाची पुनर्प्रक्रीया करावी. तद्नंतरही आलेली किंमत जर हातच्या किंमतीपेक्षा कमी येत असेल तर विभाग प्रमुखांनी प्रशासकीय विभागाच्या सल्ल्याने निविदा स्विकारावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१६०६२११११११३६३९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: CN = Narayan Bhaskar Ringane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2016.06.22 10:56:30 +05'30'

**( ना.भा.रिंगणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. * प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा))-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
२. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
३. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
४. * महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. * राज्यपालांचे सचिव
६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
८. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग.
१०. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग
११. राज्य निवडणूक आयोग.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई
१७. * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१८.* प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
१९.* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
२०.* प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२१.* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२२.* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय मादाम कामा रोड, मुंबई
२३.* प्रमुख न्यायाधिश, कुटुंब न्यायालय, नागपूर / मुंबई, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१
२४.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली .

२५. उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई/पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक / अमरावती
२६. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद / नाशिक/ अमरावती
२७. सर्व उप कोषागार अधिकारी
२८. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख
२९. सर्व विभागीय आयुक्त
३०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३१. सर्व जिल्हाधिकारी
३२. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१
३३. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३५. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी
३६. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१
३७. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
३८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर,वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२०,
३९. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही,पटेल रोड, मुंबई-४०० ००४
४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
४१. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेय (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२८
४२. नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री पेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१.
४३. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८,
४४. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, दादर, मुंबई- ४०० ०२८,
४५. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
४६. निवड नस्ती, विनियम, वित्त विभाग.

*पत्राव्दारे.